भाग – १

# १. आम्ही चालवू हा पुढे वारसा

**जगदीश खेबूडकर** (१९३२–२०११) : प्रसिद्ध मराठी कवी, साहित्यिक, गीतकार. मराठी चित्रपटसृष्टीसाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर गीतांचे लेखन केले आहे. त्यांनी लिहिलेली गीते अत्यंत लोकप्रिय आहेत. त्यांनी सुमारे ३२५ मराठी चित्रपटांसाठी गीते लिहिली आहेत. त्यांनी २५ पटकथा व संवाद, ५० लघुकथा, ५ नाटके, दूरदर्शन मालिका, टेलिफिल्म्स् यांसाठी लेखन केले आहे. 'गदिमा पुरस्कार', 'साहित्य सम्राट पुरस्कार', 'व्ही. शांताराम स्मृति पुरस्कार', 'जीवनगौरव पुरस्कार' यांसारख्या ६० हून अधिक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

गुरूच्या शिकवणीतून सद्‌गुण अंगी बाणवून सत्कार्ये करणे, म्हणजे गुरूने दिलेला वारसा पुढे चालू ठेवणे होय. हा वारसा पुढे चालू ठेवण्याचे आश्वासन प्रस्तुत गीतातून कवी देत आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

गुरुने दिला ज्ञानरूपी वसा
आम्ही चालवू हा पुढे वारसा !

पिता-बंधु-स्नेही तुम्ही माउली
तुम्ही कल्पवृक्षातळी सावली
तुम्ही सूर्य अम्हां दिला कवडसा !

जिथे काल अंकुर बीजातले
तिथे आज वेलीवरी ही फुले
फलद्रुप हा वृक्ष व्हावा तसा !

शिकू धीरता, शूरता, वीरता
धरू थोर विद्येसवे नम्रता
मनी ध्यास हा एक लागो असा !

जरी दुष्ट कोणी करू शासन
गुणी सज्जनांचे करू पालन
मनी मानसी हाच आहे ठसा !

तुझी त्याग-सेवा फळा ये अशी
तुझी कीर्ति राहील दाही दिशी
अगा पुण्यवंता भल्या माणसा !







P5BDE7

**शिक्षकांसाठी :** प्रस्तुत गीत विद्यार्थ्यांकडून तालासुरांत म्हणवून घ्यावे. तसेच इतर गीतांच्या ध्वनिफिती ऐकवाव्यात.